ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक

स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २५ पुणें, बुधवार तारीख १ जुलै, १९५९ अंक २६

## विविध माहिती

**सुएझचा कालवा रुंद करणार**—सुएझचा कालवा रुंद करण्याच्या पहिल्या टप्प्याच्या कामाला लवकरच प्रारंभ होणार आहे. ह्या कामासाठी सुमारें १५ लाख इजिप्शिअन पौंड खर्च येणार असून तें पूर्ण होण्यास १४ महिने लागतील. राडरच्या साह्यानें वाहतुकीचें नियंत्रण करणें आणि कालव्यांतील गाळ काढणें ह्या कामांचीहि पुनर्घटना हळुहळु करण्यांत येणार आहे.

**बोकॅरो येथील पोलादाचा कारखाना**—हिंदमधील चौथा पोलादाचा कारखाना बोकॅरो येथें काढण्यांत येणार आहे. कारखान्यासाठी लागणारीं यांत्रिक हत्यारें व इतर माल ठेवण्यासाठी लागणारी इमारत बांधून पूर्ण झाली आहे. कारखान्याची यंत्रसामुग्री रांची येथील संकल्पित ओतकामाच्या कारखान्याकडून मिळणार आहे. १९६२ सालीं पोलाद-कारखाना सुरू होईल.

**काथ्याच्या मालाच्या बाजारपेठा**—काथ्याच्या अखिल भारतीय बोर्डाच्या अध्यक्षांनीं अमेरिका, कॅनडा, युरोप, इत्यादि परदेशांचा दौरा केला. त्यांच्या मतानें अमेरिका व कॅनडा येथें काथ्याच्या वस्तूंना चांगली बाजारपेठ मिळूं शकेल. पण काथ्याच्या मालाचा दर्जा व रंग ह्याबद्दल परदेशीय गिऱ्हाइकांची खात्री होणें आवश्यक आहे.

**तांत्रिक शिक्षणाचें महाविद्यालय**—भारतामधील तांत्रिक शिक्षणाचें तिसरें महाविद्यालय २१ जुलैपासून मद्रास येथें सुरू करण्यांत येणार आहे. विद्यालयाच्या स्थापनेस पश्चिम जर्मन सरकार मदत करणार आहे. सध्यां मद्रास सरकारनें दिलेल्या जागेत काम सुरू होईल. लवकरच संस्थेसाठी स्वतंत्र इमारत बांधण्याचें काम हातीं घेण्यांत येईल. तूर्त १०० विद्यार्थ्यांची सोय करण्यांत आली आहे;

**मुंबई राज्यांतील साखरेच्या किंमती**—मध्यवर्ती सरकारशीं विचारविनिमय करून मुंबई राज्यांतील साखरेच्या किंमतींना स्थैर्य आणण्याचे प्रयत्न करण्यांत येत आहेत. साखरेचे व्यापारी व कारखानदार ह्यांच्या सहकार्यानें साखरेची वाजवी किंमतीचीं दुकानें उघडण्यांत येण्याचा संभव आहे. साखरेचें वांटप करण्यासाठी शहरांतून सहकारी संस्थांचा आश्रय करण्यांत येईल.

**तांदुळाची सहकारी गिरणी**—भंडाऱ्यापासून २८ मैलांवर असलेल्या सिहोरा गांवीं सहकारी तत्त्वावर चालविण्यांत येणारी तांदुळाची गिरणी काढण्यांत येणार आहे. गिरणीसाठी लागणाऱ्या ७५,००० रुपये भांडवलापैकीं निम्में मुंबई सरकार देणार असून बाकीच्या भांडवलाची भरती गिरणीच्या पुरस्कर्त्यांकडून होणार आहे.

**तांदुळाच्या किंमतीवरील नियंत्रण**—पश्चिम बंगलमधील तांदुळाच्या चढ्या किंमतींना आळा बसावा म्हणून राज्यसरकारनें भारत सरकारच्या सल्ल्यानें नियंत्रणें घातलीं होतीं. परंतु भात व तांदूळ ह्या दोन्हींवरील किंमतीवरील नियंत्रणें अयशस्वी झालीं आहेत, अशी कबुली राज्याचे मुख्य मंत्रि डॉ. बी. सी. रॉय ह्यांनीं दिली आहे.

**जामनगर येथील मेडिकल कॉलेज**—जामनगर येथील मेडिकल कॉलेजचा विस्तार करण्याचें मुंबई सरकारनें ठरविलें आहे. ह्या कामासाठी ७० लाख रुपयांपेक्षा अधिक रक्कम खर्च करण्यांत येणार आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत कॉलेजांत प्रवेश घावयाच्या विद्यार्थ्यांची संख्या १०० करण्यांत येण्याचा संभव आहे. सध्यां दरसाल ६० विद्यार्थ्यांची सोय आहे. कॉलेजची इमारत बांधून पुरी होत आली आहे. त्यासाठी ३७ लाख रु. लागले.

**कच्छमधील वीजपुरवठा**—मुंबई राज्य वीजबोर्डानें कच्छमधील गांवांना क्रमाक्रमानें विजेचा पुरवठा करण्याची एक योजना आंखली आहे. कांडला येथील विद्युत्-उत्पादन-केंद्र लवकरच चालू होईल. केंद्रांत ६,००० किलोवॅट वीज तयार होऊं शकते. तें उभारण्यासाठी ६०,००,००० रु. खर्च आला आहे. त्यामधून विजेचा पुरवठा करण्यांत येईल.

**वहातुकीसाठी सहकारी संस्था**—मालाची वहातूक करणारी सहकारी संस्था स्थापन करण्याचें पश्चिम बंगाल सरकारनें ठरविलें आहे. कलकत्ता शहरांतील व बंगालमधील ज्या मार्गांवर मालाची भरपूर वहातूक होत असेल, त्या मार्गांवर ही संस्था आपल्या मालकीच्या मोटारी चालवील. पश्चिम बंगालचा ट्रॅन्सपोर्ट कमिशनर सहकारी संस्थेचा अध्यक्ष म्हणून काम पाहील.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

### चीनच्या लोकसंख्येचा संभाव्य धोका

मद्रास येथील लोकसंख्याविषयक प्रश्नांचा अभ्यास करणाऱ्या संस्थेचे संचालक डॉ. चंद्रशेखर ह्यांनीं चीनच्या वाढत्या लोकसंख्येच्या धोक्याबद्दल इशारा दिला आहे. चीनचा सहा आठवड्याचा दौरा करून आल्यावर हाँगकाँग येथें बोलतांना ते म्हणाले कीं, चीनच्या भरमसाठ वाढत चाललेल्या लोकसंख्येमुळें तो देश म्हणजे आशिआंतील एक भयस्थान झालें आहे. चीनमध्यें औद्योगिक विज्ञानाची व यंत्रविद्येची प्रगति होत आहे. चीनचें सैन्यहि वाढत आहे. त्यामुळें चीन आक्रमक बनेल किंवा काय हें आजच सांगतां येणार नाहीं. तथापि, अविकसित देशांत फार मोठी लोकसंख्या असणें ही बाब गळ्यांतील धोंड असल्यासारखी होते, हें मात्र खरें. चीनमध्यें हुकूमशाही राजवट असल्यामुळें माणसाच्या वैयक्तिक जीवनाला फारशी किंमत नसते. म्हणून मोठी लोकसंख्या उपकारक ठरण्याचाहि संभव आहे. चीनमध्यें रोज सुमारें ५५,००० मुलें जन्माला येत आहेत. गेल्या तीन वर्षांत चीनची लोकसंख्या दरसाल २ कोटींनीं वाढत चालली आहे. ह्याच वेगानें वाढ होत गेली, तर ऑस्ट्रेलिआच्या लोकसंख्येच्या दुप्पटीनें ती लवकरच होऊं लागेल. सुमारें १२ वर्षांच्या अवधींत चीनची लोकसंख्या अमेरिकेच्या आजच्या लोकसंख्येइतकी अधिक वाढेल. १९५३ सालीं चीनची खानेसुमारी करण्यांत आली. त्यावेळीं चीनच्या मुख्य भूमीवरील लोकसंख्या ५८.३ कोटी भरली. आतां ती ६८ कोटींच्या घरांत गेली असण्याचा संभव आहे. १९५० सालीं वाढीची टक्केवारी २ टक्के होती, ती गेल्या वर्षी २.५ टक्के झाली आहे. मृत्यूची टक्केवारी मात्र उतरलेली आहे. १९५२ सालीं दर हजारीं १८ मृत्यु असें प्रमाण होतें. १९५९ सालीं हेंच प्रमाण ११ झालें आहे. लोकसंख्येच्या वाढीचें हेंहि एक प्रमुख कारण आहे.

### मनगटी घड्याळांचा संकल्पित कारखाना


भारत सरकारनें मनगटी घड्याळांचा एक कारखाना काढण्याची योजना मंजूर केली आहे. मुंबईमधील फिनिक्स वॉच कंपनी कांहीं फ्रेंच कंपन्यांच्या साह्यानें हा कारखाना काढणार असून तो बंगलोर अगर पुणें येथें निघण्याचा संभव आहे. फ्रेंच कारखानदार संकल्पित कारखान्याच्या भांडवलापैकीं ५० टक्के भांडवल देणार आहे आणि तांत्रिक साह्यहि पुरविणार आहे. कारखान्याची यंत्रसामुग्री व इतर साहित्य परदेशाहून आयात करण्यांत येणार आहे. ह्या कारखान्याशिवाय घड्याळें तयार करण्याचे अधिक कारखाने उभारण्याच्या योजना मध्यवर्ती सरकारपुढें आहेत. ह्या कामीं जपान, पूर्वजर्मनी व इतर देश ह्यांची मदत मिळण्याचा संभव आहे. भारत व फ्रान्स ह्यांच्या सहकार्यानें निघणारा कारखाना दरसाल सुमारें १ लाख मनगटी घड्याळें प्रारंभीं निर्माण करूं शकेल. त्यानंतरच अंदाजें तीन ते पांच वर्षांच्या काळांत कारखान्याची सर्व उत्पादनक्षमता वापरली जाऊं लागेल आणि घड्याळांचें उत्पादन सालीना ३ ते ३॥ लाख इतकें होऊं लागेल. सध्यां कारखान्यांत कामाची एकच पाळी ठेवण्यांत येणार आहे. १९५७ सालीं परदेशी घड्याळांच्या आयातीवर बंदी घालण्यांत आली. तोंपर्यंत भारत दरसाल २० लाख घड्याळें आयात करीत होता असा अंदाज आहे. प्रथमपासूनच घड्याळांत वापरण्यांत येणारे बहुतेक भाग देशांतच बनविण्याचा प्रयत्न करण्यांत येणार आहे. तरीपण प्रारंभीं कांहीं भाग परदेशांतून मागवावे लागतील. अशा भागांची संख्या हळुहळु कमी करण्यांत येणार आहे. पांच वर्षांच्या अवधींत भारतांत तयार होणारी मनगटी घड्याळें संपूर्णतया देशी होतील. हिंदी तंत्रज्ञांना फ्रेंच कारखान्यांतून शिक्षण देऊन तयार करण्यांत येणार आहे.

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय.
विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४

अन्नाचें रहस्य


बेडेकर मसाले, लोणचीं, पापड
ह्या वस्तूंनीं आपल्या जेवणांत गोडी वाढते व समाधान वाटतें.
★ व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. ★
दुकानें — मुगभाट, ठाकुरद्वार, दादर, कोट, परळ
— द. ना. हेर्जीब, ३० शुक्रवार पेठ, पुणें —





किर्लोस्कर
अिलेक्ट्रिक पंपिंग सेट
यांत्रिक दृष्ट्या परिपूर्ण व दीर्घकाळ टिकणारे.
आपल्या शेतांची जोपासना करण्यासाठीं एकमेव साधन म्हणजेच किर्लोस्कर पंपिंगसेट. भारतांत सर्वत्र समाधानकारक काम करीत आहेत.
सविस्तर माहितीसाठीं लिहा.
किर्लोस्कर ब्रदर्स लि., किर्लोस्करवाडी, द. सातारा

# अर्थ

बुधवार, ता. १ जुलै, १९५९





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


### रशिआंतील भांडवलगुंतवणुकींत अडचणी

आर्थिक नियोजनाचें तत्त्व कारखान्यांपुरतें मर्यादित न ठेवतां सर्व देशाला लागूं करण्याच्या बाबतींत पहिलें पाऊल सोव्हिएट रशिआनें टाकलें. त्यानंतर एकामागून एक पंचवार्षिक योजना अंमलांत आणून रशिआनें आपली प्रगतीहि साधली. पण रशिआनें आपला सहावा कार्यक्रम पांच वर्षांचा न ठेवतां सात वर्षांचा ठेवला आहे त्यावरून आणि रशिआचे पंतप्रधान मि. ख्रुश्चोव्ह ह्यांच्या आदेशावरून रशिआंत भांडवलाचा तुटवडा पडल्याचे तर्क करण्यांत येत आहेत. मूळच्या सप्तवार्षिक कार्यक्रमांत जुन्या कारखान्यांच्या आधुनिकीकरणाबरोबरच नव्या कारखान्यांच्या उभारणीवरहि जोर देण्यांत आला होता. पण नवीन हुकुमाप्रमाणें उत्पादनवाढीचीं उद्दिष्टें शक्य तितकीं कारखान्यांच्या आधुनिकीकरणानेंच गांठण्यांत यावींत असें ठरविण्यांत आलें आहे. रशिआच्या सप्तवार्षिक कार्यक्रमाचें उद्घोषित ध्येय उत्पादनाच्या बाबतींत अमेरिकेवर मात करण्याचें आहे. तेव्हां भांडवलाच्या तुटवड्यामुळें रशिआच्या नियोजित कार्यक्रमांत बराच फरक पडण्याचा संभव आहे. १९१७ सालीं रशिआंत बोल्शेव्हिक क्रांति झाली. त्यानंतर आजपर्यंत जितक्या भांडवलाची गुंतवणूक करण्यांत आली तितकी गुंतवणूक सप्तवार्षिक कार्यक्रमांत करण्यांत यावयाची होती. ह्यावरून त्याच्या अवाढव्यतेची कल्पना येईल. रशिआचे उपपंतप्रधान मि मिकोयान ह्यांनींहि पाश्चिमात्य देशांना रशिआंत भांडवल गुंतविण्याचें आवाहन केलें आहे. गुंतविलेल्या भांडवलावर चांगलें व्याज देण्याची तयारीहि त्यांनीं दाखविली आहे. रशिआची औद्योगिक प्रगति साधण्यासाठी परदेशी भांडवलाची मदत १९२० नंतर रशिआनें कधींहि मागितलेली नाहीं. आतां अशा मदतीची अपेक्षा करण्यांत येत आहे, ही गोष्ट सूचक मानण्यास हरकत नाहीं.

---

### भिलई येथील कारखान्याचें उत्पादन

भारतामधील पोलादाच्या तीन मोठ्या कारखान्यांपैकीं भिलई व रुरकेला येथील कारखाने चालू होऊन कांहीं महिन्यांचा काळ लोटला आहे. ह्या अवधींत दोन्ही कारखान्यांचें उत्पादन हळू-हळू वाढत चाललें आहे. पोलादाच्या कारखान्याच्या अनुषंगानें जे इतर कारखाने निघूं शकतात त्यांचीहि रूपरेषा स्पष्ट होत चालली आहे. भिलई येथील बिडाच्या लोखंडाचें उत्पादन कमाल मर्यादेपर्यंत वाढत चाललेलें आहे. मार्च महिन्यांत कारखान्यांत २४,०३० टन लोखंड निर्माण करण्यांत आलें; तर एप्रिल महिन्यांत २७,१५८ टन लोखंड निर्माण करण्यांत आलें. कांहीं दिवशीं तर १,००० टनांपेक्षाहि जास्त लोखंड निर्माण करण्यांत आलें. रुरकेला येथील उत्पादनांत मात्र फारशी प्रगति झालेली नाहीं. एप्रिल महिन्यांत दररोज अवघें ५१७ टन लोखंड निर्माण करण्यांत आलें. एप्रिल महिन्याच्या अखेरपर्यंत रुरकेला येथील कारखान्यांत ३८,१५९ टन लोखंड निर्माण करण्यांत आलें. ह्याच अवधींत भिलई येथील कारखान्यांत सुमारें ६७,००० टन लोखंड निर्माण करण्यांत आलें. हे दोन्ही कार-खाने जवळ जवळ एकाच वेळीं सुरू झालेले आहेत. पण यंत्रसामुग्रींत कांहीं बिघाड झाल्यामुळें रुरकेला येथील उत्पादनांत अडथळा आला. सध्यां भिलईच्या कारखान्यामधून डांबर हा एकच उपपदार्थ मिळूं शकत आहे. मार्च महिन्यांत १,०५८ टन डांबर व एप्रिल महिन्यांत १,१६४ टन डांबर निर्माण करण्यांत आलें. भिलई येथील कारखान्यामधून लवकरच बेनझॉल मिळूं लागेल असा अंदाज आहे. चालू वर्षअखेर उपपदार्थ तयार करण्याचा कारखाना पूर्णांशानें चालू होईल.

---

### कंपनी कायद्याच्या कारभाराबाबत जिल्हा कोर्टांना अधिकार

१९५६ च्या कंपनी कायद्याखालील कांहीं बाबींचे बाबतींत जिल्हा कोर्टांना प्राथमिक अधिकारक्षेत्र भारत सरकारनें नुकतेंच दिलें आहे. त्यामुळें कंपनी कायद्याच्या अंमलबजावणीस सुलभता येईल आणि कोर्टखर्चांत बरीच बचत होईल. कंपनी कायद्यांत, जेथें जिल्हा कोर्टांचा मुद्दाम उल्लेख केलेला नाहीं, त्या ठिकाणीं हायकोर्टांलाच अधिकार दिलेले आहेत. भारत सरकारनें कंपनी कायद्याच्या १० (२) कलमाखालीं नवीन नोटिफिकेशन काढलें आहे. कंपनीच्या दप्तरांतील चार्जेस व गहाणखातें ह्यांचें रजिस्टर दुरुस्त करणें, भागदार किंवा कुणीहि नागरिक ह्याला कंपनीच्या भागदारांची यादी व वार्षिक हिशेब तपासण्याची परवानगी देणें, भागदाराला ताळेबंदाच्या व ऑडिटरच्या रिपोर्टांच्या प्रती मिळणें, रजिस्ट्रारनें कंपनीकडून माहिती व खुलासे मागविणें, इत्यादि महत्त्वाच्या बाबतींत जिल्हा कोर्टांना आतां अधिकार देण्यांत आले आहेत.

---

### टेलिव्हिजनवरील जाहिराती

दहा वर्षांपूर्वी फक्त अमेरिका, ब्राझील, क्युबा आणि मेक्सिको ह्या देशांतील टेलिव्हिजनवर कारखानदार वेळ भाड्यानें घेऊन आपल्या मालाची जाहिरात करूं शकत असत; आतां ३२ देशांतील टेलिव्हिजनवर अशी जाहिरात करतां येते आणि ती ३६ कोटी लोकांना पोंचूं शकते. अमेरिका व ग्रेटब्रिटन हे देश वगळले, तर बाकी सर्व देशांत राजधानीच्या आजूबाजूच्या प्रदेशाबाहेर त्याची कक्षा फारशी पोंचत नाहीं हें खरें असलें तरी लोकांची क्रयशक्तीहि तेथेंच एकत्रित झालेली असते हेंहि सत्य आहे. जाहिरातीचा दर अर्ध्या मिनिटाला ८,००० रुपये एका देशांत, तर दुसऱ्या देशांत ३०० रुपये असा असूं शकतो. टेलिव्हिजनवरील जाहिरातीचें तंत्र अमेरिकेंत सर्वांत पुढें गेलें आहे आणि ग्रेट ब्रिटनमध्यें त्याचें अनुकरण केलें जातें. दक्षिण अमेरिका खंडांत जाहिरातीचा दर अत्यल्प आहे आणि भाड्यानें घेतलेल्या वेळेचा उपयोग करण्याचें तंत्रहि प्रगति पावलेलें नाहीं.

## तेलवहातुकीच्या बोटींची संकलित खरेदी

परदेशांकडून तेल आणण्यासाठी भारत सरकार तीन तेल वहातुकीच्या बोटी खरेदी करण्याचा विचार करीत आहे. सध्यां सरकारजवळ समुद्रपर्यटन करूं शकणाऱ्या मोठ्या तेलवाहू बोटी नाहींत. फक्त किनाऱ्या-किनाऱ्यानें वहातूक करणाऱ्या दोन बोटी आहेत. नवी प्रत्येक बोट ३०,००० टन तेल आणूं शकणारी असेल. अशा प्रकारच्या बोटी दीर्घ मुदतीच्या उधारीच्या अटीवर पुरविण्याचें कांहीं दोस्त राष्ट्रांनीं कबूल केलें आहे. तेलवाहू बोटी हातांत आल्यावर त्यामधून भारत आपल्याला लागणारें तेल आणूं शकेल. भारताला दरसाल सुमारें ४५ लाख टन अशुद्ध तेल परदेशांतून आयात करावें लागतें आणि त्याच्या वहातुकीसाठी १२ कोटी रुपये खर्च करावा लागतो. हा सर्व वहातूक खर्च अर्थातच परदेशीय कंपन्यांच्या पदरांत पडतो. हिंदुस्थानांतील तेलाचा पुरवठा बर्माशेल, स्टॅनव्हॅक आणि काल्टेक्स ह्या कंपन्यांमार्फत होतो. त्यांना आपली वहातूक करण्यासाठी वरील बोटी भाड्यानें देण्यांत येणार आहेत. तेलशुद्धीच्या आपल्या कारखान्यांना लागणारें अशुद्ध तेल ह्या कंपन्यांनीं सरकारच्या मालकीच्या बोटींतून आयात करावें अशी अपेक्षा करण्यांत येत आहे. त्यामुळें परदेशीय चलनाची बरीच बचत होणार आहे. बहुधा १९६१ च्या प्रारंभीं तेलवाहू बोटी मिळूं शकतील. तथापि तेल कंपन्यांनीं सरकारच्या मालकीच्या बोटी वहातुकीसाठी वापरण्याची तयारी दाखविली तर पुढील वर्षाच्या अखेरीसहि त्या मिळण्याची व्यवस्था होण्यासारखी आहे. परदेशीय चलनाच्या टंचाईमुळें भारताला गेलीं कांहीं वर्षें अडचणीच्या परिस्थितींतून मार्ग काढावा लागत आहे. तेलाच्या वहातुकीवर होणारा परदेशीय चलनाचा खर्च कमी होणें हिताचेंच आहे.

## कामगारांची उत्पादनक्षमता वाढविण्याची जरूरी

बिहारचे मजूरमंत्री पं. बुद्धानंद झा ह्यांनीं दालमिआनगर येथें भाषण करतांना हिंदी कामगारांची उत्पादनक्षमता वाढविण्याच्या मुद्यावर महत्त्वाचे विचार प्रगट केले. ते म्हणाले कीं जागतिक बाजारपेठांत भारताला आपलें स्थान टिकवावयाचें असेल तर कामगारांच्या उत्पादनक्षमतेंत वाढ करण्यांत आली पाहिजे. नाहींतर अधिक प्रगत देशांच्या स्पर्धेपुढें भारताचा टिकाव लागणार नाहीं. आज जे देश औद्योगिक दृष्ट्या प्रगत झालेले आहेत, त्या देशांतील कामगार व भारतामधील कामगार ह्यांच्या उत्पादनक्षमतेंत तुलनाच होऊं शकत नाहीं; इतके भारताचे कामगार मागें आहेत. आजकाल जगाच्या बाजारपेठांतून औद्योगिक दृष्ट्या पुढारलेले देश आणि अविकसित देश ह्यांची स्पर्धा चालू आहे. दिवसेंदिवस ही स्पर्धा अधिकच तीव्र होत चालली आहे. उत्पादनाच्या नवीन पद्धति व तंत्र ह्यांची कास धरण्याचें काम कारखान्यांच्या चालकांनीं करावयाचें आहे. नवीन कल्पनांचा स्वीकार करण्याची तयारी त्यांनीं दाखविली पाहिजे. उत्पादनवाढीच्या नव्या तंत्रांबाबत उदासीन राहाणें अथवा त्यांना विरोध करणें हें कामगारांच्याहि हिताचें ठरणार नाहीं. कामगार—संघटनांनीं ह्या बाबतींत योग्य ती वृत्ति धारण केली पाहिजे आणि आपल्या सभासदांना योग्य मार्ग दाखविला पाहिजे. तथापि, उत्पादनाच्या नवीन पद्धति अंमलांत आणतांना माणसामाणसांच्या संबंधांकडे दुर्लक्ष करतां कामा नये. ह्या पद्धती स्वीकारतांना कामगारांना अधिक जलदीनें अगर तीव्रतेनें काम करण्याची संवय लावून घ्यावी लागेल. पण त्यामुळें त्यांच्या सुरक्षिततेला अगर आरोग्याला बाधा येणार नाहीं अशी खबरदारी घेण्यांत आली पाहिजे.

## चेकोस्लोव्हाकिआचें सहकार्य मिळण्याची शक्यता

भारताची आर्थिक व औद्योगिक भरभराट घडवून आणण्यासाठी बड्या देशांचें सहकार्य घेण्यांत येत आहे. इंग्लंड, अमेरिका, रशिआसारख्या देशांकडून मिळणारी आर्थिक व तांत्रिक मदत अर्थातच मोठ्या प्रमाणावर असते. पण पोलंड, चेकोस्लोव्हाकिआसारख्या छोट्या पण औद्योगिक दृष्ट्या पुढारलेल्या देशांकडून मिळणारी मदतहि कांहीं कमी मोलाची असत नाहीं. हिंदमधील स्कोडा ह्या चेक कंपनीचे डायरेक्टर मि. मॅथ्यूज नुकतेच चेकोस्लोव्हाकिआला जाऊन आले. ते म्हणाले कीं, भारताच्या औद्योगीकरणाला झेक देशाची मदत मिळणें खूपच शक्य आहे. भारत व झेक ह्यांच्यांत नुकताच करण्यांत आलेला करार त्या दृष्टीनें महत्त्वाचा आहे. पोलंड व रशिआ ह्यांच्याशीं ज्या प्रकारचे करार करण्यांत आले आहेत. तसाच हाहि करार आहे. त्यामुळें भारताच्या आर्थिक प्रगतींत सहभागी होणें झेकोस्लोव्हाकिआला सुकर होईल. भारतांत 'जनता मोटार' निर्माण करण्याचा सरकारचा विचार आहे. ह्या योजनेविषयीं स्कोडा कंपनीला आस्था वाटत आहे. कारण, अशा प्रकारची एक छोटी व स्वस्त गाडी स्कोडा कंपनी आपल्या मायदेशीं करीत आहे. ही गाडी पांच जणांना पुरेल अशी आहे व ती एका गॅलनला ५० मैल जाते. त्याशिवाय मुंबईमधील दोन कंपन्या चेकोस्लोव्हाकिआच्या सहकार्यानें ट्रॅक्टर्स व मोटारसायकल्स तयार करण्याचे कारखाने काढण्यास तयार आहेत. वालचंदनगर येथें साखर कारखान्यांची यंत्रसामुग्री तयार करण्याच्या कामींहि स्कोडा कंपनी सहकार्य देत आहे. वालचंदनगर येथें सिमेंटच्या कारखान्यासाठी बॉयलर्स व इतर यंत्रसामुग्री तयार करण्याचा कारखाना काढण्याच्याहि वाटाघाटी चालू आहेत. अशा रीतीनें स्कोडाच्या तांत्रिक अनुभवाचा भारताला फायदा मिळूं शकेल.

## श्री. वि. अ. पटवर्धन ह्यांची सेवानिवृत्ति

"अर्थ" ज्या मुद्रणालयांत छापला जातो, त्या आर्यभूषण प्रेसचे श्री. वि. अ. ऊर्फ शासाहेब पटवर्धन आजपासून निवृत्त होत आहेत. गेल्या साडेचोवीस वर्षांच्या कालांत "अर्था" चा अंक मंगळवारीं ठराविक वेळीं टपालांत पडला नाहीं किंवा दिवाळीचा अंक ऐन दिवाळींत वाचकांना मिळाला नाहीं, असें एकदांहि घडलें नाहीं, ह्याचें श्रेय छापखान्याचे अधिकाऱ्यांना आहे, हें उघड आहे. श्री. पटवर्धन ह्यांची निष्ठा, कार्यक्षमता, सततोद्योग, आणि कामाचा उरक ह्याची कल्पना परिचितांना पुरेपूर आहे. घेतलेलें काम ठराविक वेळीं तयार करण्याच्या त्यांच्या हातोटीचें महत्त्व मुद्रणव्यवसायी लोकांना तात्काळ पटेल; आर्यभूषणच्या ग्राहकांना तर त्याचा प्रत्यक्षच अनुभव आहे. कुष्ठरोगनिवारणाच्या कामासाठी ते आतां अमरावतीस जात आहेत; समाजसेवेस ते वाहून घेत आहेत. त्यांना आम्हीं त्यासाठी आयुरारोग्य चिंतितों.

**मुंबई ते प्राग विमानप्रवास**—मुंबईहून झेकोस्कोव्हाकिआची राजधानी प्राग शहर ह्यांच्या दरम्यान थेट विमानप्रवासाची सोय होणार आहे. हा प्रवास करण्यासाठी झेक सरकार रशिअन बनावटीचें टी. यू. १०४ हें जेटवर चालणारें विमान वापरणार आहे. ४,३२० मैलांचा हा प्रवास विमान १० तासांत पुरा करील. मार्ग मुंबई, कैरो, बहरिन व प्राग असा राहील.

## बँकेकडून आपणांस कर्ज म्हणून पैसा कसा उभारतां येतो?

एक काळ असा होता कीं कोणीहि मनुष्य दुसऱ्याकडून कर्ज काढणें म्हणजे मानहानी व कमीपणाचें लक्षण समजत असे, आणि आपणाजवळ जेवढा पैसा असेल त्यांतच तो आपला धंदा चालवीत असे. आजचें युग भांडवलप्रधान उद्योगधंद्याचें व स्पर्धेचें आहे. व्यापारी अगर कारखानदार व त्याचे नोकर यांचेमध्यें नेहमीं तंटे होत असतां मोठमोठ्या कारखान्यांत यंत्राप्रमाणें काम चाललेलें असतें व कितीहि धनवान मनुष्य असला तरी शक्य त्याप्रकारें भरपूर भांडवल उभारल्याशिवाय धंदा करणें अशक्य आहे. असें न केल्यास त्यांचें व देशाचेंहि नुकसान होतें. तेव्हां अशा परिस्थितींत कर्ज कोण घेत नाहीं? सरकार, कॉर्पोरेशन, नगरपालिका, शिक्षणसंस्था, कारखानदार अगर कंपन्या, जमीनदार कोणीहि असो सर्वांना कर्ज हें घ्यावेंच लागतें कारण भांडवली स्वरूपाच्या योजना आखल्यास त्यास भरपूर पैसा प्रथम खर्च करावा लागतो व पैशाशिवाय अशा योजना अंमलांत आणणें अशक्य असतें. तेव्हां आपणांस जेव्हां धंद्यासाठीं कर्ज म्हणून पैसा उभा करावयाचा असेल त्यावेळीं आपण आपल्या एखाद्या मित्रावर आपलें वजन खर्च करून त्याचेपासून कर्ज घेणें योग्य नाहीं, कारण असा व्यवहार व्यक्तीच्या जबाबदारीवर असणें योग्य नाहीं. अशा सर्व गोष्टींचा विचार करून आपणांस जेव्हां धंद्यासाठीं रक्कम हवी असेल तेव्हां ती आपल्या धंद्याचे पतीवर व योग्य नियमानुसार घेणेंच ठीक होईल. कर्ज घेण्यापूर्वीं आपण असा विचार केला पाहिजे कीं, आपण कोणत्या कारणासाठीं कर्ज घेत आहोंत, जर आपण अनुत्पादक कारणासाठीं कर्ज घेतलें तर तें फेडण्याची तरतूद काय आहे, आपलें उत्पन्न किती व खर्च किती व आपल्या बचतीमधून आपण घेतलेल्या कर्जाची व्याजासुद्धां ठराविक मुदतींत कशी फेड करतां येईल यासंबंधींची व्यवस्था आपण प्रथम ठरविली पाहिजे. जर आपणांस घेतलेलें कर्ज आपल्या उत्पन्नांतून फेडतां आलें नाहीं तर आपणांस आपल्या जवळील सोनें अगर शेअर्स अगर रोखे विकून कर्जाची भरपाई करावी लागेल.

### तारणावर कर्ज

आपणाजवळ कांहीं कर्जरोखे, डिबेंचर्स, शेअर्स असतील तर त्यांचे तारणावर बँक आपणांस कर्ज देऊं शकते. अशा प्रकारच्या तारणांचे भाव बाजारांत रोज बदलत असतात. तेव्हां अशा प्रकारच्या तारणावर कर्ज देतांना बँका त्यांची त्या दिवसाची बाजारभावाची किंमत पाहून साधारण ८० टक्के रक्कम कर्ज म्हणून देतात. त्यासाठी आपले नांवचे असलेले रोखे बँकेच्या नांवानें करून द्यावे लागतात व शिवाय निराळा कर्जरोखाहि लिहून द्यावा लागतो. कर्ज देण्यापूर्वीं आपण दिलेले रोखे आपल्या पूर्ण मालकीचे आहेत व शेअर्सची पूर्ण रक्कम भरलेली आहे वगैरेबद्दल बँक खात्री करून घेते. सदर कागदपत्रांची बाजारांत कमी किंमत झाल्यास बँक आपणांकडून फरकाची रक्कम वसूल करूं शकते. तसेंच या उलट जर बाजारांत आपल्या कागदपत्रांची किंमत वाढली तर आपण तें विकूं शकतो व फरकाची रक्कम आपणांस मिळूं शकते. अशा प्रकारें कर्जरोख्यांत लिहून दिलेल्या शर्तीहि आपणांस पाळाव्या लागतात.

### मालाचे तारणावर कर्ज

कारखानदार अगर व्यापारी माल बँकेचे गोडावूनमध्यें तारण ठेवून त्यावर कर्ज घेऊं शकतात. सदर मालाची बाजारभावाप्रमाणें किंमत ठरवून बँक ६० टक्के पर्यंत कर्जाऊ रक्कम देते. परंतु सदर मालावर आपली पूर्ण मालकी असली पाहिजे व त्यासंबंधींचे खरेदीचे सर्व कागदपत्र बँकेकडे हजर करावे लागतात. बँकेचें जर गोदाम नसेल तर आपणांस गोदाम उपलब्ध करून द्यावें लागेल; आणि माल गोदामांत ठेवून त्याची किल्ली बँकेजवळ राहीलच. त्यावर बँकेची पाटी व सील लावलें जाईल. जर आपणांस मध्यंतरीं गोडाऊन उघडावयाचें असेल तर त्यासाठी बँकेची अनुमति घ्यावी लागेल. गोडाऊनमध्यें ठेवलेल्या मालाचा विमा आपणांस उतरावा लागेल. आपण विमा न उतरल्यास बँक विमा उतरून त्याचा खर्च आपणांकडून वसूल करील. माल नाशवंत असल्यास आपणांस तो मुदतींत विकण्याची व्यवस्था करावी लागेल. बाजारभावांत मालाची किंमत कमी झाली तर फरकाची रक्कम आपणांस द्यावी लागेल. आपणांस कांहीं माल परत घेणें असल्यास आपण त्या प्रमाणांत रक्कम भरून माल ताब्यांत घेऊं शकतो. माल खराब होत आहे असें जर बँकेस वाटलें तर बँक आपणांस माल विकण्यासंबंधीं नोटीस देईल व आपण माल न विकल्यास बँक मालविक्री करून पैसे आपणांजवळ ठेवून घेईल. तसेंच आपण जर मुदतींत कर्ज फेडलें नाहीं तर बँक आपणांस नोटीस देईल व त्याप्रमाणें घेतलेली कर्जाऊ रक्कम परत केली नाहीं तर माल विकून बँक आपली रक्कम वसूल करून घेईल. असें करूनहि बँकेचें देणें शिल्लक राहील तर अशा रकमेच्या वसुलीबद्दल बँक कायदेशीर इलाज करूं शकते तरी असा प्रसंग न येण्याची आपण दक्षता घ्यावी.

### मालाच्या अधिकारपत्रावर कर्ज

कांहीं वेळां माल प्रत्यक्ष मालकाच्या ताब्यांत नसतो; परंतु त्यासंबंधीं मालकी हक्क सिद्ध करणारे कागदपत्र त्याचेजवळ असतात. त्याला इंग्रजींत 'डॉक्युमेंट ऑफ टायटल' म्हणतात. त्यावर बँका कर्ज देऊं शकतात. कांहीं वेळां माल परदेशांतून मागविलेला असतो व तो प्रत्यक्ष आपले येथें जहाजांतून येण्यास वेळ लागतो परंतु जहाजाचा कप्तान मालाच्या वर्णनासहित मालकाकडे एक अधिकारपत्र पाठवितो, त्याला 'बिल ऑफ लेडिंग' म्हणतात. अगर कांहीं वेळां आलेला माल सरकारी ड्युटीस पात्र असल्यास तो सरकारच्या वखारींत ठेवलेला असतो. अशा वेळीं मालकास वखारवाल्याकडून दाखला देण्यांत येतो. अशा स्वरूपाचा मालकी हक्क प्रस्थापित करणाऱ्या कागदोपत्री पुराव्यावर बँका कर्ज देऊं शकतात.

### माल ताब्यांत न ठेवतां त्याचे तारणावर कर्ज

कारखानदार कच्चा माल खरेदी करून त्यापासून पक्का माल तयार करून विकतात. तेव्हां अशा वेळीं कारखानदारांना माल बँकेच्या गोडाऊनमध्यें ठेवणें शक्य होत नाहीं. अशा प्रसंगींसुद्धां खरेदी–विक्रीचा व्यवहार व मालाची किंमत पाहून बँका मालाचे तारणावर कर्ज देऊं शकतात. याकरितां बँक रोजची विक्रीची रक्कम खात्यांत भरावयास सांगतात अगर कर्जवसुलीच्या सुरक्षिततेसाठी दुसऱ्या कांहीं अटी घालतात.

### विमा पॉलिसीवर कर्ज

आपली विमा पॉलिसी असल्यास आपण त्याचे सर्व हप्ते वेळेवर भरले आहेत किंवा नाहीं व त्याची आजची 'सरेंडर

व्हॅल्यू' काय आहे ती अजमावून व त्याची खात्री करून घेऊन त्यावर बँका कर्ज देऊं शकतात.

### घरें, शेती व इतर तारणांवर कर्ज

हल्लीं निरनिराळ्या राज्यांत भाडेनियंत्रण कायदा, कूळ कायदा, वगैरे कायदे अस्तित्वांत येत असल्यामुळें अशा तारणावर कर्ज देऊं नये अशा सूचना बँकांना देण्यांत आल्या आहेत.

### सोन्याचांदीचे तारणावर कर्ज

सोन्याचांदीचे बाजारभाव पाहून आपण बँकेंत ठेवलेल्या मालावर बँका कर्ज देऊं शकतात. यदाकदाचित् भाव कमी झाल्यास आपणांस फरकाची रक्कम भरावी लागते.

### जामीन देऊन कर्ज

एकदां आपली लायकी बँकेस माहिती झाल्यावर बँक आपले जामीनकीवर थोड्या मुदतीचें कर्ज देऊं शकते. आपणहि जामीन दिला तरी बँक प्रथम आपल्या लायकीचा विचार करील व आपणांकडून जरूर तें करारपत्र लिहून घेईल. आपल्या जामीनकीवर बँकेनें कर्ज दिल्यास त्यांतील शर्तीचें पालन करण्याची जबाबदारी दोघांवर आहे. कर्ज घेणाऱ्यानें रक्कम न भरल्यास ती जामीनदारास भरावी लागते हें लक्षांत असूं द्यावें. असा प्रसंग येणार नाहीं अशी दक्षता घ्यावी.

### हुंडी मर्यादा

बँका हुंड्या स्वीकारतात व त्यावर आपणांस कर्ज मिळूं शकतें अगर बँकाहि हुंड्या स्वतः काढतात. व्यापारी पद्धतीप्रमाणें प्रत्येक व्यापाऱ्यास त्याचेकडे आलेली हुंडी स्वीकारावीच लागते, तसें न केल्यास त्याची बाजारांत पत कमी होते व त्याचेवर कोणी विश्वास ठेवणार नाहीं. एक बँक दुसऱ्या बँकेपासूनहि कर्ज घेऊं शकते. यासाठीच निरनिराळ्या प्रकारच्या बँकांची स्थापना करण्यांत आली आहे. शेड्यूल्ड बँकांना रिझर्व्ह बँकेकडून कर्जाऊ रक्कम मिळण्याची व्यवस्था सरकारनें केली आहे. समाजाचा व देशाचा आर्थिक व्यवहार योग्य रीतीनें चालावा यासाठीच सरकारनें इंपीरियल बँकेचें रूपांतर केलें आहे. त्यामुळें खेडोंपाडीं बऱ्याच ठिकाणीं बँकेच्या शाखा स्थापन होत असून सुलभतेनें समाजास व इतर व्यापारी वर्गास कर्ज देण्याघेण्याची सोय होत आहे. —व्यापारी मित्र, मे १९५९.

---

रशिआचा सप्तवार्षिक कार्यक्रम—रशिआचे पंतप्रधान नि. ख्रुश्चोव्ह ह्यांनीं एका औद्योगिक प्रदर्शनाचें उद्घाटन करतांना असे उद्गार काढले कीं, रशिआ आपला सप्तवार्षिक कार्यक्रम ५ अगर ६ वर्षांच्या अवधींच पुरा करील. चालू वर्षाच्या पहिल्या ५ महिन्यांत कित्येक उद्योगधंद्यांत गेल्या वर्षाच्या ह्याच काळाच्या मानानें उत्पादन खूप वाढलें आहे.

सिगारेट्चा सरकारी कारखाना—मध्यवर्ती सरकारच्या मदतीनें सिगारेट्सचा एक कारखाना काढण्याचा आंध्र प्रदेश सरकारचा विचार आहे. नवा कारखाना काढण्याऐवजीं राज्यांतील कांहीं सिगारेट्सचे कारखानेच सरकार घेण्याचा संभव आहे. गुंतुर जिल्ह्यांतील तंबाखू पिकविणाऱ्या शेतकऱ्यांची सोय व्हावी म्हणून हा उपक्रम करण्यांत येत आहे.

नवान बोटींची खरेदी—इंडिअन नॅशनल स्टीमशिप ओनर्स असोसिएशनच्या अध्यक्ष श्रीमती सुमति मोरारजी ह्यांनीं लंडन येथें असें सांगितलें कीं हिंदमधील बोट कंपन्या ब्रिटनऐवजीं जपान व जर्मनी ह्या देशांकडे बोटींच्या मागण्या नोंदवीत आहेत. कारण जपानी व जर्मन बोटींच्या किंमती कमी असतात आणि त्याहि उशिरा दिलेल्या चालतात.

## सहकारी शेतीवरील कार्यकारी तुकडी

शेतजमिनींपैकी बरीच जमीन सहकारी तत्त्वावर लागवडीसाठीं आणली जावी म्हणून सहकारी शेतकी पद्धतीच्या विकासास भक्कम अधिष्ठान लाभण्याच्या दृष्टीनें दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत आवश्यक त्या उपाययोजना करणें हें सदर योजना काळांतील प्रमुख कार्य होय. असें ह्या योजनेंत संकल्पिलेलें आहे. स्वयंस्फूर्त संयुक्त सहकारी शेती हें भारतांतील पुढील काळांतील शेतीचें स्वरूप म्हणून रहावें ही गोष्ट भारत सरकारनें अगोदरच स्वीकारलेली आहे. संयुक्त शेती यशस्वी होण्यास योग्य तो वाव मिळावा या दृष्टीनें देशांत वातावरण निर्माण केलें पाहिजे. या कामासाठी संयुक्त सहकारी शेतकी संस्था स्थापन करूं इच्छिणाऱ्यांना आर्थिक व इतर सवलती तसेंच तांत्रिक ज्ञान व मार्गदर्शन हमखासपणें मिळूं शकेल याकडे लक्ष दिलें पाहिजे.

यासाठी उपलब्ध असलेल्या अनुभवाच्या आधारें सहकारी शेतीविषयक कार्यक्रम तयार करण्यास साह्यभूत होण्यासाठी सहकारी शेतीवरील एक कार्यकारी तुकडी स्थापन करण्याचा निर्णय भारत सरकारनें घेतला आहे. सदर समितीचे अध्यक्ष म्हणून आमदार श्री. एस. निजलिंगप्पा यांची निवड करण्यांत आली आहे. ह्या तुकडीच्या सदस्यांत खासदार डॉ. रामसुभाग सिंग डॉ. ए. यू. शेख (मुंबई राज्याचे सहकारी रजिस्ट्रार) व श्री व्ही. एम्. जाखडे (रिझर्व्ह बँकेंतील एकॉनॉमिक्स विभागाचे डायरेक्टर) यांचा अंतर्भाव आहे.

सदर कार्यकारी तुकडीच्या चौकशीच्या विषयांत पुढील कांहीं बाबींचा अंतर्भाव आहे. (१) संयुक्त सहकारी संस्थेची संघटना व व्यवस्थापन यांचे प्रकार व पद्धति यांचें प्राथमिक कार्य, आदर्श पोट-नियम व नोंदणी, संचालन, मनुष्यबळ, पशुधन व इतर स्थानिक साधनसामुग्री यांचा पुरेपूर वापर, रोजगार वाढविण्यासाठी कुटीरोद्योगांची व इतर आनुषंगिक उद्योगधंद्यांच्या स्थापनेसाठी योजावयाचे विविध उपाय, यांसारख्या खास गोष्टींच्या संदर्भांत पहाणी करणें. (२) आर्थिक गरजेचें मूल्यमापन करून त्या कशा भागवाव्यात याबाबत सूचना करणें, (३) निरनिराळ्या पातळ्यांवरील कारभारात्मक देखरेख करणारा व तांत्रिक नोकरवर्ग किती लागेल याचा अंदाज घेणें, (४) संस्थेचे सभासद, पदाधिकारी, व्यवस्थापक, तसेंच कारभारात्मक देखरेखनीस व तांत्रिक नोकरवर्ग यांच्या शिक्षणाच्या व्यवस्थेबाबत सूचना करणें, व (५) संयुक्त सहकारी शेतीच्या कार्यक्रमास चालना देण्यासाठी जरूर वाटणाऱ्या इतर उपाययोजनांबाबत शिफारस करणें. सदर कार्यकारी तुकडीनें आपल्या स्थापनेपासून दोन महिन्यांत आपला अहवाल सादर करावयाचा आहे.

### विजेच्या पंख्यांची वाढती निर्गत

भारतांतील विजेच्या पंख्यांचें उत्पादन १९५४ मध्यें २·३९ लक्ष एवढें होतें, तें १९५८ मध्यें ६·३२ लक्ष झालें; म्हणजे तें तिपटीपेक्षाहि जास्त वाढलें आहे. ह्याच मुदतींत त्यांची निर्गत अडीच पटींनीं वाढली आहे; ९·५२ लक्ष रुपयांवरून ती २३·२४ लक्ष रुपयांवर गेली आहे. १९५८ मध्यें ज्या कांहीं थोड्या तयार मालाची निर्गत वाढली, त्यांत पंख्यांच्या निर्गतीस महत्त्वाचें स्थान आहे; ती १९५७ चे मानानें २८% ज्यास्त झाली. हिंदी पंखे आतां ३६ देशांकडे निर्गत होतात. इतर हिंदी मालाला परदेशी बाजारपेठ लाभत नाहीं, ह्याचें कारण त्यांचा उत्पादन खर्च भारी असतो आणि दर्जा स्पर्धकांचे सारखा उच्च नसतो. पंख्यांचे बाबतींत तसें नाहीं; नावाजलेल्या परदेशी कंपन्यांच्या पंख्यांशीं हिंदी पंखे गुणावर स्पर्धा करूं शकतात.

## शिवण्याच्या यंत्रांचें जपानमधील उत्पादन

### ७७% यंत्रें निर्गत होतात !

जपानी शिवण्याच्या यंत्रांची निर्गत कॅमेरे, बायनॉक्युलर्स आणि सायकली ह्यांच्या एकूण निर्गतीपेक्षाहि मोठी आहे. जपानच्या निर्गतींत आगबोटी आणि विजेचीं यंत्रें ह्यांचे खालोखाल शिवण्याच्या यंत्रांचा अनुक्रम लागतो. १९५७ मध्यें निर्गत झालेल्या शिवण्याच्या यंत्रांपैकी ५०% यंत्रें अमेरिकेंत खपलीं. उत्पादनाच्या ७७% यंत्रांची निर्गत होत आहे.

जपानी शिवण्याच्या यंत्रांचें उत्पादन व निर्गत
( आंकडे हजारांचे )

| वर्ष | उत्पादन | निर्गत | निर्गतीचें उत्पादनाशीं प्रमाण % |
|---|---|---|---|
| १९५७ | २,२५३ | १,७४५ | ७७·४ |
| १९५६ | १,८९४ | १,४८५ | ७८·२ |
| १९५५ | १,८०३ | १,५३६ | ८५·१ |
| १९५४ | १,४३९ | १,२१५ | ८४·८ |
| १९५३ | १,३९४ | ८१८ | ५८·६ |
| १९५२ | १,३२२ | ८८२ | ६६·६ |
| १९५१ | १,०७९ | ८५३ | ७९·० |
| १९५० | ५१३ | ४०८ | ७९·५ |
| १९४९ | २९९ | ९७ | ३२·४ |
| १९४८ | १८० | १८ | १०·२ |
| १९४५ | ४ | — | — |
| १९४० | १५७ | १० | ७·९ |

शिवण्याच्या यंत्रांच्या उत्पादनास जपानमध्यें १९२० च्या सुमारास प्रारंभ झाला. १९३० मध्यें फक्त ८०० यंत्रांचें उत्पादन झालें १९४० च्या सुमारास उत्पादनाचा आंकडा १,५७,००० यंत्रें एवढा वाढला. युद्धांतील हानीनंतर ह्या धंद्यानें लवकरच जम बसविला. १९५७ मध्यें जपाननें २३ लक्ष शिवण्याचीं यंत्रें तयार केलीं.

शिवण्याच्या यंत्रांचा धंदा, जुळणी करणाऱ्या, २० पेक्षा कमी कामगार असलेल्या छोट्या कारखान्यांचे स्वरूपांत आहे. फक्त ११ फर्म्समध्यें प्रत्येकीं ३०० पेक्षा अधिक कामगार आहेत. सुटे भाग करण्याचे कारखानेहि छोटेखानी आहेत. सुटे भाग करणाऱ्या ४०० कारखान्यांपैकीं फक्त एकाच कारखान्यांत ३० पेक्षा अधिक कामगार आहेत. सुटे भाग बनविणाऱ्या कारखान्यांत तयार होणारे भाग दुसऱ्या कारखान्यांत एकत्र आणून तयार यंत्रें बनविण्यांत येतात, त्यामुळें कमी भांडवलांत मोठ्या प्रमाणावर उत्पादन करतां येतें. ओसाका, टोकियो आणि नागोया येथें उत्पादन केंद्रित झालेलें आहे. निर्गत होणाऱ्या यंत्रांपैकी ६०% यंत्रें ओसाका येथें तयार केलेलीं असतात.

---

### एक आणा व अर्धा आणा किंमतीचीं पिवळीं नाणीं

एक आणा व अर्धा आणा किंमतीचीं निकेल-ब्रासचीं ( पिवळी ) नाणीं १ जानेवारी, १९६० पासून सरकार परत घेण्यास प्रारंभ करणार आहे. ३० जून, १९६० पर्यंत जी जनतेकडून स्वीकारलीं जातील. त्यानंतर मात्र रिझर्व्ह बँकेच्या मुंबई, कलकत्ता, मद्रास, कानपूर, नवी दिल्ली, बंगलोर व नागपूर येथील कचेऱ्यांतच तीं स्वीकारण्यांत येतील.

## रिझर्व्ह बँक, अर्थखात्याचा लाऊड स्पीकर ?

### " कॅपिटल " साप्ताहिकाची टीका

रिझर्व्ह बँकेच्या " ट्रेन्ड अँड प्रोग्रेस ऑफ बँकिंग इन् इंडिया " ह्या १९५८ विषयक अहवालावर कलकत्ता येथील ' कॅपिटल ' ह्या आर्थिक साप्ताहिकानें कडक टीका केली आहे. रिपोर्टांत आर्थिक परिस्थितीचा बिकटपणा नमूद केलेला आहे, पण हे प्रश्न कसे उद्भवले आणि ते कसे टाळतां आले असते, ह्याची मुद्देसूद चर्चा केलेली नाहीं, अशी त्याची तक्रार आहे. " रिझर्व्ह बँकेचा भित्रेपणा अजूनहि कायमच आहे, त्याबद्दल खेद वाटतो; सरकारी धोरणांचें समर्थन करणें आणि अर्थ खात्याचा एक लाऊड स्पीकर म्हणून काम करणें, ह्यापेक्षा रिझर्व्ह बँकेवर अधिक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या आहेत. बँकिंगची प्रगति झालेल्या देशांत मध्यवर्ती बँका स्वतंत्र विचार प्रकट करायला भीत नाहींत; त्याचा पुढील धोरणांस दिशा लावण्याच्या कामीं उपयोग होतो. भारतांत, रिझर्व्ह बँक दरसाल शालेय पाठ्यपुस्तकें प्रसिद्ध करीत असते! त्यामुळें स्वतंत्र विचार-सरणीस चालना मिळूं शकत नाहीं. खऱ्या उपलब्ध साधनापेक्षां जास्त रकमांची गुंतवणूक केल्यामुळें आजची आर्थिक परिस्थिति आली आहे, असें स्पष्ट म्हणण्यास रिझर्व्ह बँक धजत नाहीं; सरकार आणि नियोजन मंडळ दुखावलें जाईलना ! कृत्रिम चलनी नोटा प्रसृत करून गुंतवणूक करण्याला सरकारला विरोध करायच्या ऐवजीं, रिझर्व्ह बँक चलनवाढीचे दुष्परिणाम कमीच करून दाखविते.

" व्यापारी बँकांच्या हितास बाधक अशा योजना रिझर्व्ह बँक मंजूर करते. गेल्या वर्षांत, बँकांकडील ठेवी वाढल्या आहेत आणि त्यांच्या व्याजाचा बोजाहि वाढला आहे, पण कर्जांतील वाढ फारच कमी असल्यानें उत्पन्न घटलें आहे. रिझर्व्ह बँकेनें ठेवींच्या वाढीचें स्वागत केलें आहे. डिमांड ठेवींचें टाइम ठेवींत रूपांतर हें बँकिंगच्या द्वारां बचतीच्या वाढीचें स्वागतार्ह निदर्शक असल्याचें तिला वाटतें. वास्तविक, ह्या रूपांतराचीं कारणें वेगळींच आहेत. बँकिंगच्या सवयीच्या प्रसाराबद्दल रिपोर्टानें आनंद व्यक्त केला आहे. ठेवी न वापरतां आल्यामुळें सरकारी रोख्यांतील गुंतवणूक वाढली, त्याचें रिझर्व्ह बँकेनें स्वागत केलें आहे; उद्योगधंद्यांची आणखी सोय पहाण्याच्या दृष्टीनें विचार केला नाहीं. गेल्या वर्षीं कित्येक बँकांनीं " पर्सनल लोन्स स्कीम " सुरू केली, त्यावर रिझर्व्ह बँकेनें मतप्रदर्शन केलेलें नाहीं; ' तिच्या चलनविस्तार घडवून आणण्याच्या परिणामाकडे लक्ष ठेवावें लागेल ' एवढेंच म्हटलें आहे. "

---

**घरबांधणीसाठी मदत**—१९५८-५९ ह्या आर्थिक वर्षांत आयुर्विमा कॉर्पोरेशननें राज्य सरकारांना ४ कोटी रुपयांची रक्कम घरबांधणीच्या कामासाठी पुरविली, अशी माहिती कॉर्पोरेशनच्या अध्यक्षांनीं जाहीर केली आहे. ह्या रकमेची राज्यवार वांटणी मध्यवर्ती सरकारकडून करण्यांत आली. ह्या कामीं अधिक साह्य देण्याचा विचार चालू आहे.

**हरिजनांचा मंदिरप्रवेश**—अहमदाबादमधील सुप्रसिद्ध स्वामी नारायणाच्या मंदिरांत आतांपर्यंत फक्त स्पृश्य हिंदूंनाच प्रवेश मिळत असे. पण आतां हरिजनांनाहि मंदिरांत प्रवेश करण्याची मुभा देण्यांत आली आहे. ह्या मंदिरांत प्रवेश मिळविण्यासाठी १९४९-५० सालीं हरिजनांनीं सत्याग्रहहि केला होता. त्यानंतर प्रकरण हायकोर्टाकडे गेलें होतें.

## भारतांत लष्करी ट्रकचें उत्पादन

जबलपूर येथील गन कॅरेज फॅक्टरींत तयार झालेली पहिली तीन टनी लष्करी मोटार ट्रक तेथील विभागांतून रविवार २१ जून रोजीं, म्हणजे ट्रक निर्मिति विभागाचें उद्घाटन औपचारिक रीत्या पंतप्रधानांच्या हस्तें झालें त्यावेळीं, बाहेर काढण्यांत आली.

ऑर्डिनन्स फॅक्टऱ्यांत लष्करी मोटार ट्रक तयार करण्याची ही नवी योजना म्हणजे संरक्षणविषयक सामुग्रीच्या बाबतींत स्वयंपूर्णता साधण्याच्या दृष्टीनें आणखी एक महत्त्वाचा टप्पा असून ती मे. मॅन ( मशिनेनफॅब्रिक ऑसबर्ग-नुरेनबर्ग ए. जी. ) या सुविख्यात जर्मन फर्मच्या सहकार्यानें हातीं घेण्यांत येत आहे. सदर फर्मनें तयार केलेलें बहुविध जळणाचें (मल्टीफ्युएल) इंजिन या ट्रकमध्यें बसविण्यांत येईल. आजवरच्या पेट्रोल किंवा डिझेल इंजिनापेक्षा सदर इंजिनाचे युद्धाच्या हालचालीच्या दृष्टीनें अनेक फायदे आहेत.

मोटार ट्रकच्या उत्पादनास ३० टक्के देशी सुट्या भागांचा वापर करून प्रारंभ करण्यांत येत आहे. आणि ऑर्डिनन्स फॅक्टऱ्या उत्पादनाच्या पांचव्या वर्षांत ९० टक्क्यांवर देशी सुटे भाग वापरूं शकतील अशी आशा आहे.

लष्करी ट्रकचे निरनिराळे सुटे भाग निरनिराळ्या ऑर्डिनन्स फॅक्टऱ्यांत तयार करण्यांत येतात. अंबरनाथ येथील मशीन टूल प्रोटोटाइप फॅक्टरींत ट्रान्सफर केसिस हा महत्त्वाचा सुटा भाग बनविला जातो. त्याच्या निर्मितीसाठी उच्च दर्जाचें कसब लागतें. लेढ स्प्रिंग हा दुसरा महत्त्वाचा भाग असून तो कानपूर येथील ऑर्डिनन्स फॅक्टरींत तयार केला जातो. मुख्य जुळणी विभाग गन कॅरेज फॅक्टरींत राहणार आहे. देशी सुट्या भागांच्या बाबतींत सदर कारखान्यानें सर्वांत जास्त कामगिरी केली आहे.

बहुविध जळणाच्या इंजिनांचे सुटे भाग तयार करण्याच्या योजना आतां तयार करण्यांत आहेत. त्यांपैकी कांहीं भागांचें उत्पादन विशेष कठीण असतें.

ऑर्डिनन्स फॅक्टऱ्यांत तयार होणाऱ्या ट्रकला कमी खर्च पडेल व त्यामुळें संरक्षण खात्याच्या अर्थसंकल्पांत बरीच बचत होऊं शकेल असा अंदाज आहे. बहुविध जळणाचीं इंजिनें बसविल्यानें हे चार चाकी ट्रक डोंगराळ भागांतून वाहतूक करण्याच्या दृष्टीनेंहि भक्कम ठरतील.

## रुपयाच्या नोटांच्या आयातीवर निर्बंध

रिझर्व्ह बँकेनें काढलेल्या एका हुकुमान्वयें, भारतांत कायदेशीर चलन असलेल्या रुपयाच्या नोटा या देशांत पाठविण्याची परवानगी कोणाहि व्यक्तीस दिली जाणार नाहीं. अशा नोटा आंत असलेलीं पुडकीं वा पार्सलें २२ जून, १९५९ रोजीं वा त्यानंतर भारतांत आल्यास रिझर्व्ह बँकेचा खास परवाना नसेल तर कस्टम्स खात्याकडून संबंधित नियमान्वयें ती जप्त केली जातील. तथापि भारतांत येणाऱ्या उतारूंना पूर्वीप्रमाणेंच भारतीय रुपयाच्या नोटा बरोबर आणतां येतील. इराणी आखातांतील देशांत प्रचारांत आणण्यासाठी काढलेल्या खास नोटा बरोबर आणणाऱ्या उतारूंनीं आपल्या आगमनानंतर कस्टम्स खात्यास तसें सांगितलें पाहिजे.

## मच्छीमारीच्या धंद्याला अधिक उत्तेजन

कलकत्ता येथें मच्छीमारीच्या धंद्याविषयीं संशोधन करणारें एक केंद्र स्थापन करण्यांत आलें आहे. ह्या केंद्रांत समुद्र वगळून इतर प्रकारच्या जलाशयांचा मच्छीमारीच्या धंद्यासाठी कसा उपयोग करतां येईल ह्यासंबंधीं संशोधन करण्यांत येणार आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत मच्छीमारीच्या विकासासाठी अधिक रक्कम मंजूर करण्यांत येणार आहे. केंद्राच्या उद्घाटनप्रसंगीं बोलतांना मध्यवर्ती सरकारचे शेतकी खात्याचे उपमंत्री श्री. कृष्णप्पा म्हणाले कीं, भारतामधील मच्छीमारीच्या धंद्याच्या इतिहासांत ह्या केंद्राची स्थापना महत्त्वाची घटना आहे. देशांत माशांची वाढ होण्यास योग्य अशा प्रकारचे जे जलाशय असतील त्यांचा अधिकांत अधिक उपयोग करून घेण्यांत आला पाहिजे. देशांतर्गत मच्छीमारीच्या व्यवसायाबरोबरच समुद्रावरील मच्छीमारीकडेहि लक्ष देण्यांत आलें पाहिजे. अलीकडे ह्या व्यवसायाच्या तंत्रांत खूपच प्रगति झालेली आहे. त्यामुळें माशांच्या वाढीच्या वेगांत सुधारणा झाली आहे. एका जलाशयांतून दुसऱ्या जलाशयांत लागवड करण्यासाठी जेव्हां मासे नेण्यांत येतात तेव्हां त्यांतील बरेच मृत्युमुखीं पडतात. पण, अलीकडील शास्त्रीय प्रगतिमुळें माशांच्या मृत्यूची संख्या कमी करणें शक्य झालें आहे. रासायनिक कृत्रिम साधनांनीं माशांचें जनन वाढविता येणेंहि शक्य झालेलें आहे. ह्या सर्व आधुनिक तंत्रांचा उपयोग करून घेण्यांत आला पाहिजे. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत मध्यवर्ती सरकारच्या मच्छीमारीच्या योजनांसाठी १·८६ कोटी रुपये व राज्य सरकारांच्या योजनांसाठी ८·८७ कोटी रुपयांची तरतूद करण्यांत आली होती. माशांची घाऊक व किरकोळ विक्री अजून संघटित रीत्या करण्यांत येत नाहीं. सरकार त्यासाठी एक योजना आंखण्याचा विचार करीत आहे.

## सर होमी मोदी टाटांचेमधून निवृत्त

सर एच. पी. मोदी मेसर्स टाटा सन्स प्रायव्हेट लि. मधून निवृत्त होत आहेत. टाटांशीं त्यांचा २५ वर्षे संबंध होता. मुंबई हायकोर्टातील आपली बॅरिस्टरी सोडून त्यांनीं एका मोठ्या गिरणीमालकाशीं भागीदारी पत्करली होती. पुढें ते गिरणीमालक संघाचे कित्येक वर्षे अध्यक्ष होते. मालकवर्गातर्फे बाजू प्रभावी रीतीनें मांडण्यासाठी एम्प्लॉयर्स फेडरेशन ऑफ इंडिया ही संघटना त्यांनीं उभारली. लेजिस्लेटिव्ह असेंब्लीचे ते सभासद होते आणि पुढें युद्धकाळांत व्हाइसरॉयच्या एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलचे सभासद झाले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर तें कांहीं काळ मुंबई राज्याचे व नंतर उत्तर प्रदेशचे गव्हर्नर होते.

## हातमागी कापडावर मिळणाऱ्या रिबेटांत कपात

हातमागी कापडावर देण्यांत येत असलेला दर रुपयामागें ६ नये पैसे हा खास रिबेट ४ नये पैसे याप्रमाणें कमी करण्यांत येऊन तो हातमाग सप्ताहांत आणखी फक्त एका आठवड्यासाठी देण्याचें भारत सरकारनें ठरविलें आहे. त्याचप्रमाणें घाऊक विक्रीदारांस मिळणारा ६ नये पैसे हा रिबेटहि ३ नये पैशांपर्यंत आणण्याचा सरकारचा निर्णय आहे.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.